ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, २० जानेवारी, १९७१ | अंक २



## उसास दर वाढवून मिळणे अशक्य. शेतकऱ्यांनी पर्यायी पिके काढावीत.

### श्री. वसंतरावदादा पाटील यांचे मार्गदर्शन

" केंद्र सरकारचे साखर उद्योगसंबंधाचे धोरण व या धंद्यातील सध्याची परिस्थिती यांचा विचार करता या पुढच्या काळात साखर किंवा उसाला दर वाढवून मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यासाठी शेतकऱ्याने उसानंतर पर्यायी पीक घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

गेल्या तीन वर्षांत जरी पाऊस पडला नाही तरी उसाला चांगला भाव मिळाला. त्या पैशाचा उपयोग शेतकऱ्याने विहिरी काढणे यासारख्या शेती विकासाच्या कामात गुंतवला व अधाशीपणाने उसाचे क्षेत्र वाढविले. एकीकडे ऊस वाढत गेल्याने कारखाने व गाळप शक्ती वाढवावी लागली. शेतकऱ्याने पराकाष्ठेने जमिनीतून पाणी काढले पण आज त्या जमिनीत खोलवरही पाणी आढळत नाही. म्हणून, पाणी जेवढे उपलब्ध असेल तेवढेच उसाचे पीक लावावे व इतर पिके घ्यावीत. पाण्यासाठी नद्यांवर छोटे बंधारे वा धरणे घालून पाणी साठवून घेतले पाहिजे.

पार्लमेंट सतत ग्राहकांचाच विचार करते, उत्पादकांचा नाही. महाराष्ट्रात १४५ रु. दराने साखर विकली जाते तर उत्तर प्रदेशात ती १९६ रु. दराने विकली जाते. त्यासाठी केंद्राने आपल्या धोरणात बदल करून हे दरांतील फरकाचे दुष्टचक्र थांबविले पाहिजे. आम्ही नवे दर जाहीर होण्याची वाट पाहात आहोत. महाराष्ट्राला वेगळा दर व इतर राज्यांना वेगळा दर सरकारने जाहीर केला तर आम्ही त्यासाठी कोर्टातही जाऊ. "

( शेतकरी सहकारी साखर कारखाना, 'सांगली'च्या १४व्या वार्षिक सभेतील भाषण )

---

### श्री. पाठक यांचे इस्रायलला प्रयाण

दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँकेचे पुणे येथील विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक श्री. भा. वि. पाठक यांना बँकेच्या पुणे येथील कर्मचारी वर्गाच्या वतीने हार्दिक निरोप देण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभाच्या अध्यक्षपदी बँकेचे मा. अध्यक्ष श्री. नी. आ. कल्याणी हे होते. तसेच सांगलीचे सुप्रसिद्ध खासदार व सहकार महर्षी श्री. गुलाबरावजी पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

श्री. पाठक यांची इस्रायलमधील तेल अव्हिव येथील ॲफ्रो-एशियन संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी बँकेच्या वतीने निवड झाली असून हा अभ्यासक्रम साडेचार महिन्यांचा आहे. श्री. पाठक हे तेथील सहकारी चळवळीचा अभ्यास करतील.

---


## महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना - १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३–१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ५० शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १३·७५ कोटींचे वर

ठेवी : १३·२५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

वि. श्री. दामले
बी. ए., एम्. कॉम्., एलएल् बी.,
ए. आय्. आय्. सी. चेअरमन

## THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital &**
**Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT
*General Manager.*

K. B. KIRTIKAR
*Chairman.*

☆ अर्थ ☆

बुधवार, २० जानेवारी, १९७१



संस्थापक :
मा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## कर्जे महाग होणार. ठेवीदारांना व्याज जास्त मिळणार.

### रिझर्व्ह बँकेची उपाययोजना

व्यापारी बँकांनी कर्जपुरवठा अधिक केल्यामुळे १९७० मध्ये जनतेजवळील पैसा १२% नी वाढला. व्यापारी बँकांनी रिझर्व्ह बँकेकडून ३५१ कोटी रु. ची उचल केली आहे. कर्जाचा मोसम शिगेस पोचला, म्हणजे बँकांवरील ताण आणखीच वाढेल. एकीकडे कर्जे महाग करणे आणि दुसरीकडे ठेवी आकर्षण्यासाठी ठेवीदारांना जास्त व्याज देणे, अशा दुहेरी उपायांचा रिझर्व्ह बँकेने अवलंब केला आहे.

रिझर्व्ह बँकेने बँक रेट ५% चा ६% केल्याचे ८ जानेवारी रोजी सायंकाळी जाहीर केले. त्यामुळे बँकांनी दिलेल्या कर्जावरील व्याजाचे दर सरासरी १ टक्याने वाढतील. अग्रस्थान असलेल्या विभागांना दिलेल्या कर्जाच्या रिफायनान्सचा दर वाढणार नाही. बँकांच्या ठेवीवरील व्याजाच्या दराची कमाल मर्यादा वाढविण्यात आली आहे. लहान बँकांना ह्या दरापेक्षा जरा जास्त व्याज देण्याची सवलत कायम राहील.

### ठेवीवरील व्याजाचे नवे दर ( % )

( ११-१-१९७१ पासून अमलात )

| ठेवीचा प्रकार | ५० कोटीपेक्षा जास्त ठेवीच्या हिंदी शेड्यूल्ड बँका आणि विदेशी बँका | २५ ते ५० कोटींच्या बँका | | १० ते २५ कोटींच्या बँका | | १० कोटी-खालील बँका | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान |
| चालू ठेवी आणि १४ दिवसापर्यंतच्या ठेवी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| सेव्हिंग्ज खाती | ४ | ४ | | ४ | | ४ १/२ | ४ |
| १५ ते ४५ दिवस | २ | २ | — | २ | — | २ | — |
| ४६ ते ९० दिवस | ३ | ३ | — | ३ | — | ३ | — |
| ९१ दिवस ते ६ महिने | ४ १/४ | ४ ३/८ | ४ १/४ | ४ १/२ | ४ १/४ | ४ ३/४ | ४ १/४ |
| ६ ते ९ महिने | ४ ३/४ | ४ ७/८ | ४ ३/४ | ५ | ४ ३/४ | ५ १/४ | ४ ३/४ |
| ९ महिने ते १ वर्ष | ५ १/४ | ५ ३/८ | ५ १/४ | ५ १/२ | ५ १/४ | ५ ३/४ | ५ १/४ |
| १ वर्ष ते २ वर्षे | ६ | ६ १/८ | ६ | ६ १/४ | ६ | ६ १/२ | ६ |
| २ वर्षे ते ३ वर्षे | ६ १/२ | ६ ५/८ | ६ १/२ | ६ ३/४ | ६ १/२ | ७ | ६ १/२ |
| त्यापुढे ५ वर्षांपर्यंत | ७ | ७ १/८ | ७ | ७ १/४ | ७ | ७ १/२ | ७ |
| ५ वर्षांवरील | ७ १/४ | ७ ३/८ | ७ १/४ | ७ १/२ | ७ १/४ | ७ ३/४ | ७ १/४ |

---

## दररोज पाच नव्या बँक शाखा उघडल्या

### ग्रामीण विभागास प्राधान्य

१९ जुलै, १९६९ ते ३० सप्टेंबर, १९७० ह्या मुदतीत पब्लिक सेक्टरमधील ( राष्ट्रीयीकरण केलेल्या १४ बँका आणि स्टेट बँकेचा गट ) बँकांनी दररोज पाच नव्या शाखा उघडल्या. एकूण १,९६५ शाखा नव्याने उघडण्यात आल्या. त्यांत इतर व्यापारी बँकांनी उघडलेल्या शाखा मिळविल्या म्हणजे नव्या शाखांची संख्या २,२५७ भरते. त्या सर्वांपैकी १,५२७ म्हणजे ६७·७% शाखा जेथे पूर्वी एकही बँक नव्हती, अशा ठिकाणी उघडण्यात आल्या.

सप्टेंबर, १९७० अखेर व्यापारी बँकांच्या कचेऱ्यांची संख्या १०,५१९ झाली आहे. १९६७ अखेर ती फक्त ७,०२५ होती.

१९६० नंतर भारताची लोकसंख्या १२ कोटींनी वाढली आहे. तरीसुद्धा, व्यापारी बँका प्रत्येकी पूर्वीपेक्षा अधिक लोकांच्या सेवेसाठी सिद्ध आहेत. जुलै, १९६०मध्ये ९२,००० लोकसंख्येस एक कचेरी असे प्रमाण होते. जुलै, १९६९ मध्ये ६५,००० लोकसंख्येस एक कचेरी असे प्रमाण होते. ३० सप्टेंबर, १९७० रोजी ५२,००० लोकसंख्येस एक कचेरी असे प्रमाण पडले.

ज्या जिल्ह्यात एकही बँक नाही, अशांची संख्या १९६७ अखेर १३ होती, ती आता ७ वर उतरली आहे. हे सर्व जिल्हे मुख्यत: डोंगराळ भागातले आहेत. ह्या जिल्ह्यांतही शाखा उघडण्याचे लायसेन्स देण्यात आले आहेत.

जुलै, १९६९ ते जून, १९७० ह्या मुदतीत व्यापारी बँकांकडील ठेवीस ५४१·५ कोटी रु. ची वाढ झाली. त्यांपैकी नव्या शाखांनी ७९·४ कोटी रु. ( १४·७% ) दिले. नव्या शाखांपैकी ग्रामीण शाखांचा वाटा ३६·९ कोटी रुपये आणि शहरी शाखांचा वाटा ४२·५ कोटी रु. होता.

१८ जुलै, १९६९ ते २६ जून, १९७० ह्या मुदतीत हिंदी शेड्यूल्ड व्यापारी बँकांनी दिलेल्या कर्जात ६६६·७ कोटी रु.ची वाढ झाली. त्यांपैकी नव्या कचेऱ्यांनी ४१·५ कोटी रु. ची कर्जे दिली—२६·२ कोटी रु. ग्रामीण भागांत आणि १५·२ कोटी रु. शहरी भागांत.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणापूर्वी शेड्यूल्ड व्यापारी बँकांनी एकूण १२ लक्ष कर्जदारांना कर्जे दिलेली होती. सप्टेंबर, १९७० मध्ये शेतीविषयक कर्जखात्यांचीच संख्या १० लक्ष भरली. लघुउद्योग, ट्रकवाले, किरकोळ विक्रेते, छोटे व्यापारी, धंदेवाले, ह्यांसही कर्जपुरवठा वाढला आहे.

## चलनवृद्धीविरुद्ध अधिक कडक निर्बंध हवेत

दक्षिण गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू आणि प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. सी. एन्. वकील ह्यांनी बँक रेटमध्ये करण्यात आलेल्या १ टक्का वाढीचे स्वागत केले असून चलनवृद्धीविरुद्ध अधिक कडक निर्बंध जारी करण्यात यावेत असे सुचविले आहे. पत्रकारांशी ह्या विषयासंबंधी बोलताना ते म्हणाले, की गेली तीन वर्षे शेतीच्या उत्पादनाच्या दृष्टीने चांगली गेलेली आहेत. असे असूनही किमतीमध्ये एकसारखी वाढ होत चालली आहे. ह्यावरून अर्थव्यवस्थेवर चलनवृद्धीचा दाब असल्याचे दिसून येते. त्यातही मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारने ह्यांची वृत्ती आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करण्याची आहे. शिवाय, प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीत्या तुटीचा अर्थभरणा करण्याचेही त्यांचे धोरण आहे. ह्याचा परिणाम चलनवृद्धीचा ताण अधिक वाढण्यातच होणार आहे. स्वतःवर निर्बंध घालून उत्पन्नाच्या मर्यादेत राहण्याऐवजी सरकार किमती रोखण्याचे इतर उपाय योजीत आहे. बँक रेट ५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर नेऊन कर्जपुरवठ्याची किंमत वाढविल्याने हे साध्य होईल असा सरकारचा अंदाज आहे. ह्या उपायाचा परिणाम म्हणून काही प्रमाणात व काही काळ किमती वाढण्याचे थबकेलही. परंतु त्यामुळे किमती वाढण्याच्या मूळच्या कारणांचा निचरा होणार नाही. खरे म्हणजे सरकारने व जनतेनेही चलनवृद्धीवर अधिक कडक नियंत्रण ठेवण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. अर्थात त्याच वेळी शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या उत्पादनात वाढ करण्याचे प्रयत्नही जारीने करण्यात आले पाहिजेत. तरच किमती रोखण्याबाबत यश येण्याची शक्यता आहे.

---

## परदेशी प्रवासी पैसा कसा खर्च करतात ?

भारतातील प्रेक्षणीय स्थळे पाहाण्यासाठी हजारो परदेशीय प्रवासी येत असतात. त्यामुळे भारताला परदेशीय चलनाची प्राप्तीही बरीच होते. हे प्रवासी दौऱ्यावर असतांना पैसे कशावर खर्च करतात, ह्यासंबंधी एक पाहाणी करण्यात आली आहे. पाहाणीतील माहिती बरीच मनोरंजक म्हणता येईल. प्रवाशांना आपल्या खर्चाच्या अंदाजपत्रकापैकी १२·१ टक्के रक्कम जेवणाखाण्यावर व राहण्याच्या जागेवर खर्च करावी लागते. २६·३टक्के रक्कम भारतांतर्गत प्रवासावर खर्च होते आणि २८·३ टक्के रक्कम हौसेमौजेच्या वस्तू खरेदी करण्यावर खर्च होते. ३·४ टक्के रक्कम किरकोळ बाबींवर खर्च करण्यात येते. वस्तू खरेदी करण्यासाठी खर्च होणाऱ्या पैशांपैकी ७३ टक्के रक्कम रेशमी वस्त्रावर आणि हातमागावरील विविध प्रकारच्या कापडावर खर्च करण्यात येते. ह्याच वस्तूंची परदेशात नेहमी निर्यात करण्यात येत असते.

---

## परदेशी पदव्यांचे प्रस्थ नको

खरगपूर येथील तांत्रिक विद्यापीठाच्या पदवीदान प्रसंगी बोलताना प्रा. एम्. एस्. थँकर ह्यांनी मोलाचे विचार व्यक्त केले आहेत. प्रा. थँकर हे दिल्लीतील तांत्रिक विद्यापीठाचे अध्यक्ष आहेत. पदवीदान समारंभात ६५० विद्यार्थ्यांना पदव्या अगर पदविका देण्यात आल्या. प्रा. थँकर आपल्या भाषणात म्हणाले, की उच्च शिक्षणाचा कारभार जे चालवितात त्यांनी परदेशीय विद्यापीठांच्या पदव्यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देता कामा नये. खाजगी अगर सार्वजनिक विभागातील औद्योगिक संघटनांतून नोकऱ्या देताना देशातील उच्चतम तांत्रिक विद्यासंस्थांतून उत्तीर्ण झालेल्यांनाही योग्य तो वाव मिळाला पाहिजे. तसे करण्यात आले नाही तर ह्या संस्थांतून उच्च शिक्षण घेण्यासाठी करण्यात येत असलेला सर्व खर्च अनाठायी होत आहे असे म्हणावे लागेल. परंतु हा प्रश्न केवळ वाया जाणाऱ्या खर्चाचाही नाही. उच्च विद्यासंस्थांतून पदव्या घेऊन बाहेर पडणारे जे तरुण अधिक शिक्षणासाठी परदेशी जातात त्यांच्यापैकी कित्येक जण परत येतच नाहीत. एंजिनिअरिंगच्या पदवीधरांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आणि काही तरी नवे करून दाखविण्याची जिद्द धरली पाहिजे. त्यांना छोटे उद्योगधंदे काढता येतील. त्याचप्रमाणे रोजखपाच्या वस्तू आणि शेतीची अवजारे तयार करता येतील. सध्या ह्यांपैकी कितीतरी माल आयात करण्यात येत असतो. परदेशीय तंत्रज्ञान आणि साधने ह्यांच्यावर पूर्णतया अवलंबून राहणे योग्य होणार नाही. परंतु जे तंत्रज्ञान आयात करण्यात आले आहे, त्यांचा वापर करण्याचे कसब आत्मसात् करण्यात आले पाहिजे.

---

## शिकारीची योजना रद्द करण्यात आली

हिंदमध्ये येणाऱ्या बड्या परदेशीय नागरिकांचा एक शौक म्हणजे जंगलातील शिकार. परतंत्र भारतात तर अशा शिकारीसाठी एक खातेच संस्थानांना ठेवावे लागत असे. हीच प्रथा अजूनपर्यंत थोड्याबहुत प्रमाणात चालू होती. परंतु त्यामुळे हिंदमधील जंगलातील दुर्मिळ पशू नष्ट होण्याच्या मार्गाला लागले. आसामच्या सरकारने परदेशी प्रवाशांसाठी योजण्यात येणाऱ्या शिकारींच्या कार्यक्रमांना मज्जाव केला आहे. इतर राज्यांप्रमाणे आसामनेही पट्टया वाघाच्या शिकारीला बंदी घातलेली आहे. आसाममधील राखीव जंगलात वन्य पशूंना अभय देणारे विभाग राखून ठेवण्यात आले आहेत. सध्या अशा विभागात पट्टयाचे मोठे वाघ ५२७ आहेत. त्यांची हत्या थांबविण्यासाठी उपाय योजणे आवश्यक झाले आहे.

---

**कुटुंब नियोजनाच्या फिल्मची सक्ती**— प्रत्येक सिनेमा लायसेन्स धारकाने आपल्या थिएटरमध्ये प्रत्येक खेळाचे आरंभी कुटुंबनियोजन विषयक एक लघुपट दाखविलाच पाहिजे, अशी सक्ती करणारा हुकूम महाराष्ट्र राज्य सरकारने काढला आहे.

## मुंबईमधील टेलिफोनच्या सोयी वाढविण्यातील अडचणी

मुंबई शहरात १,८०,००० टेलिफोन आहेत आणि ५५,००० लोकांनी "ओन युवर टेलिफोन" पद्धतीने टेलिफोन मिळण्यासाठी नावे नोंदलेली आहेत. टेलिफोनची वाढ होण्याच्या मार्गातील प्रमुख अडचणी जमीन, इमारती, सामग्री आणि केबल्स ह्यांची दुर्मीळता प्रत्येक टेलिफोन बसविण्यास (ट्रंक कॉलच्या सोईसकट) सुमारे ७,००० रु. खर्च येतो. लोकल कॉलपुरतीच सोय हवी असल्यास ३,८०० रुपयांत भागू शकेल. ह्या ३,८०० रुपयांपैकी सुमारे ६०% म्हणजे २,२०० रुपये टलिफोन एक्सचेंजपासून टेलिफोन बसवावयाचा त्या जागेपर्यंत जमिनीखालून तांब्याच्या तारांच्या जाळ्यासाठीच लागतात. मुंबईमधील टेलिफोनचे दळण-वळण एका बाजूला उत्तर मुंबई, ठाणे आणि वसई विभागाकडून फोर्ट विभागाकडे चालते. फोर्ट, फाउंटन, सचिवालाय, काळबादेवी ह्या ३ चौरस किलोमिटर क्षेत्रातील टेलिफोनची बोलण्या-साठी गर्दी एकूण गर्दीच्या ४८% असते. टेलिफोन कुठेही बसविलेला असो, तेथून ह्या विभागातील टेलिफोनची घंटी मारली जाते. टेलिफोनचीही रहदारी एकतर्फीच असते. लोकलमधून सकाळी लोकलने सर्वजण उत्तर मुंबईतून फोर्टमध्ये जातात परंतु टेलिफोनच्या वाहतुकीचे एक वैशिष्ट्य आहे. कितीही लांबीचा प्रवास असला, तरी रेल्वेच्या रुळात काही फरक पडत नाही. पण, जसजसे अंतर वाढेल तसतशी टेलिफोनची केबल अधिकाधिक चांगल्या दर्जाची वापरावी लागते. उदाहरणार्थ, वॉढवी रोड ते मांडवी एक्सचेंजवरील टेलिफोनची तांब्याची तार ०·४ मिमि. व्यासाची पुरते, तर माटुंग्याच्या टेलिफोनसाठी ०·६३ मिमि. ची आणि ठाण्याच्या किंवा बोरिवलीच्या टेलि-फोनसाठी ०·९ मिमि. ची तार लागते. ठाणे किंवा मालाड येथील क्षेत्रातल्या क्षेत्रात टेलिफोन कॉल्स फारच थोडे असतात; बहुतेकांना फोर्टमधील टेलिफोनचीच घंटा मारावयाची असते. म्हणजे, जास्त व्यासाच्या तारेची त्याला आवश्यकता असते. उपनगरात टेलिफोन-साठी मागणी झपाट्याने वाढत आहे. पण, एवढ्या लांबच्या अंतरावरून फोर्टशी संबंध राखणाऱ्या तारा जास्त व्यासाच्या आणि दर्जाच्या घालाव्या लागतात. त्यांचा तर तुटवडा आहे. अशा व्यासाच्या आणि दर्जाच्या तारा नसतील, तर उपनगरातल्या माणसाला टेलिफोन मिळाला तरी फोर्टमधील माणसाशी जरुरीच्या वेळी बोलताही येणार नाही. जेव्हा विजेचे कनेक्शन देण्यात येते, तेव्हा त्याच तारांतून प्रत्येक घराला कनेक्शन देता येते; टेलिफोनसाठी प्रत्येक ग्राहकाच्या ठिकाणापासून एक्सचेंजपर्यंत दोन तारा घालाव्या लागतात. टेलिफोन एक्सचेंजेसची संख्या वाढविण्याचा प्रश्न ह्या समस्येशी निगडित आहे. मुंबईमधील पाहणीचा निष्कर्ष असा आहे की १९८४ पर्यंतच्या मागणीस टेलिफोन पुरे पडण्याकरिता दक्षिण मुंबईत २६, मध्य मुंबईत २०, उत्तर मुंबईत ११, पश्चिम वसईत २८ आणि पूर्व वसईत २० टेलिफोन एक्सचेंजेस लागतील.

---

## अमेरिकेतील बँकांमध्ये चोरी-दरोड्यांचे वाढते प्रमाण

### संरक्षक साधनांचा अवलंब

बँकांवर दरोडे घालण्याचे आणि बँकांतील रोकड लांबविण्याचे प्रकार अमेरिकेत वरचेवर होतात. चार वर्षांपूर्वीच्या मानाने १९६९ साली त्यांचे प्रमाण दुप्पट झाले आणि त्यामुळे बँकांचे सुमारे ८ कोटी रुपयांचे नुकसान झाले. रोकड रक्कम लांबविली जाते, तिची प्रत्येक वेळची सरासरी २०,००० रु. भरते. त्यासाठी विम्याचा हप्ताही तेवढाच पडतो. तेव्हा, संरक्षक साधने बसविणे बँकांना अधिक परवडते. टेलिव्हिजन टेलर हे त्यातलेच साधन आहे. बँकेचे खातेदार हॉलमधून टेलिव्हिजन पडद्यापर्यंत जातात. ह्या पडद्यावर कॅशिअर्सचे चेहरे दिसतात, पण कॅशिअर्स वरच्या मजल्यावर सुरक्षित बसलेले असतात. सर्व व्यवहार इंटरकॉम आणि हवाबंद नळ्या ह्यांच्या द्वारा केला जातो. अशा साधनांच्या एका युनिटला एक ते दोन लक्ष रुपये खर्च येतो. एका बँकेने काम्प्यूटर नियंत्रित गजराची योजना केली आहे. त्या द्वारा चोरी किंवा दरोडा ह्यांचे संदेश सर्वत्र तात्काळ पोचविले जातात. ज्या बँका रात्री उघड्या असतात, त्यांना चोरी-दरोड्यांची अधिकच भीती असते. त्यांपैकी काहींनी ऑटोमॅटिक कॅशिअर्स बसविले आहेत. खातेदार खास प्रकारचे केडिटकार्ड यंत्रात घालतो आणि कार्डावरील ठराविक गुप्त नंबर दाबतो आणि त्या यंत्रातून त्याला सांगितलेली रक्कम बाहेर पडते. काही बँकांनी पिस्तुलाच्या गोळ्यांना दाद न देणारे पिंजरे कॅशिअर्ससाठी उभारले आहेत.

ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे अशी सामग्री करणारांच्या धंद्याला आलेली तेजी. त्यातूनच सल्लागाराचा धंदा करणाऱ्या फर्म्स उदयाला आल्या आहेत. त्या फक्त सल्ला विकण्याचे काम करतात. सतत चालू असलेले कॅमेरे बँकेत ठिकठिकाणी बसविले म्हणजे त्यांच्या कक्षेतील सर्व गोष्टी ते टिपतात. ह्या इतकी दुसरी संरक्षक योजना दुसरी कोणतीही नाही, असे त्या फर्मचे मत आहे. त्यामुळे चोराला अटक होण्याची शक्यता वाढते. न्यूयॉर्क-मधील एका बँकेने वृत्तपत्रातील जाहिरातीत असे फोटो छापले आणि आरोपींना पकडण्याच्या कामी मदत करणारांना एक लक्ष रुपये देऊ केले. त्यामुळे बऱ्याच चोरांनी अज्ञातवास पतकरला. काही बँका आपली सुरक्षागृहे अधिक मजबूत करीत आहेत. शिकागोच्या फर्स्ट नॅशनल बँकेच्या व्हॉल्टच्या दरवाज्याच्या प्रत्येक दाराचे वजन ८७ टन आहे. त्याची प्रत्येकी किंमत २५ लक्ष रु. आहे. परंतु, दरोडेखोराला पुरेसा वेळ मिळाला तर हे दारही ते फोडू शकतो. बँकेचे कर्मचारी दर साल १५ कोटी रुपयांची अफरातफर करतात, त्यावर मात्र काही इलाज सापडलेला नाही.

---

**खासदाराला रोजगार हवा**— लोकसभेचे सदस्य, उज्जनेचे श्री. हुकमचंद ह्यांनी तेथील उद्योगविनिमय केंद्रात रोजगार मिळवण्यासाठी नाव नोंदविले आहे. सैंपाक करता येतो, बँड वाजविता येतो आणि लष्करी शिक्षण देता येते, अशा त्यांच्या लायकीच्या बाबी आहेत.

## दाट लोकवस्तीचा गुन्ह्यांशी निकटचा संबंध

मनुष्यप्राणी हा मूळचा शांततेने राहणारा आह किंवा मूळचाच आक्रमक आहे ह्यासंबंधी समाजशास्त्रज्ञांत साहजिकच मतभेद आहेत. केवळ इतिहासाचेच पुरावे घ्यावयाचें तर दोन्ही बाजूंना अनुकूल घटना सापडू शकतील. ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी ब्रिटनमधील समाजशास्त्रज्ञांनी काही प्रयोग केले. खरे म्हणजे हे प्रयोग सामाजिक जीवशास्त्रज्ञांनी केले असे म्हणावयास पाहिजे. ह्या प्रयोगांती त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे, की माणसामधील आक्रमक वृत्ती ही सनातनी स्वरूपाची नाही. अत्यत दाटीवाटीने राहण्याची पाळी आली म्हणजे आक्रमक वृत्तीचा उगम माणसात होऊ लागतो. एखाद्या समाजाला भरपूर अन्न पुरविण्यात आले तर तो समाज शांतपणाने राहतो. पण, त्याच समाजाला जागेची टंचाई भासू लागली तर मात्र तो क्रूर आणि हिंसक वृत्तीचा बनू लागतो. मोठमोठ्या शहरातील अत्यंत दाट लोकवस्तीच्या भागात घडणाऱ्या गुन्ह्यांच्या सख्येवरून ही गोष्ट सहज लक्षात येते. लंडन व न्यूकॅसल ह्या ब्रिटनमधील शहरांत खेचाखेचीने राहणाऱ्या लोकसमाजात गुन्ह्याचे प्रमाण अधिक असते. भारतामधील मोठ्या शहरांची ह्या दृष्टीने तपशीलवार पाहणी केल्याचे फारसे दिसत नाही. परंतु, कलकत्ता-मुंबई सारख्या अस्ताव्यस्त व दाट वस्तीच्या शहरात गुन्हे घडण्याचे प्रमाण अधिक दिसून येते. ह्या बाबतीत शास्त्रज्ञांचे म्हणणे अ आहे की खेचाखेचीने राहणाऱ्या लोकांच्या मनात खोल कोठे तरी चिंता वास करीत असते. स्वतःची सुरक्षितता, स्वतःसाठी लागणारे अन्न, ह्यासाठी इतकेच नव्हे तर नुसत्या जगण्यासाठीही ते भयग्रस्त झालेले असतात.

---

## प्रत्येक दांपत्याला दोन मुलगे हवेत, मग चार अपत्ये होणारच

भारताची लोकसंख्या ५५·५ कोटीवर गेली असून ती १९९० किंवा १९९५ च्या सुमारास, आजच्या वाढीच्या गतीने, १०० कोटी होईल, असे युनायटेड नेशन्सच्या अभ्यास गटाचे मत आहे. म्हणजे, आजच्या अमेरिकेच्या लोकसंख्येच्या १४ पट ती होईल.

जुजबी आरोग्याच्या पातळीवर १०० कोटी लोकसंख्येस भारत जगवू शकेल परंतु अधिक लोकसंख्येस मात्र वाव नाही असे भारताच्या पुढाऱ्यांनी ठरविले, तर येत्या १० ते १५ वर्षांत जननाचे प्रमाण सध्याच्या मानाने निम्म्यावर यावयास हवे. सध्याचे जननाचे प्रमाण दरहजारी ४० ते ४५ आहे. अगदी आशावादी गोष्टी गृहीत धरल्या, तरी परिस्थिती भयानक आहे.

भारतातील प्रत्येक दांपत्याला वयात आलेले किमान दोन मुलगे हवे असतात. मुलांच्या इतक्याच मुली जन्मतात, तेव्हा चार अपत्ये होणे आले. हा दृष्टिकोन बदलल्याखेरीज कुटुंबनियोजनाचा प्रसार होणे कठीण आहे, असे भारतात चार वर्षे अवलोकन केलेल्या एका अमेरिकन तज्ज्ञाचे मत आहे.

---

## अमेरिकन शास्त्रज्ञ सरकारचे प्यादे!

शास्त्राच्या प्रगतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या अमेरिकेतील संघटनेपुढे बोलताना अमेरिकेच्या गृहखात्याच्या एका माजी सचिवाने अमेरिकन शास्त्रज्ञांवर कडक टीका केली आहे. हे माजी सचीव म्हणतात की काही क्वचित् आढळणारे अपवाद सोडले तर बहुतेक अ रिकन शास्त्रज्ञ राजकारणाच्या दृष्टीने तृतीय प्रकृतीचे असतात. सामाजिक दृष्टीने विचार करता डोळ्यांवर झापण लावलेल्या यांत्रिक माणसासारखी त्यांची स्थिती आहे. अ रिकेपुढे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्वलंत प्रश्न आहेत. अणुयुद्धाची भीती, लोकसंख्येची भयानक वाढ, भातिक परिस्थितीत उत्पन्न होत असलेला मानवनिर्मित दूषितपणा, अमेरिकेतील शिक्षणाचा अपुरेपणा, इत्यादी विविध प्रश्नांवर अमेरिकन शास्त्रज्ञ मूग गिळून आहेत. नॅशनल ॲकेडेमी ऑफ सायन्सेस ही सरकारच्या तालावर नाचणारी संघटना नाही असे समजण्यात येते. पण तसे नाही. ह्या संघटनेत सरकारने ठेवलेले सल्लागार असतात. सरकारी धोरणाचे होयबा म्हणूनच ते वावरतात. काही थोड्या शास्त्रज्ञांना समाज आणि शास्त्रे ह्यांच्यातील परस्परसंबंधांचे आकलन झालेले असून ते स्पष्टपणे बोलण्याचे धाडसही करतात. परंतु त्यांचा आवाज म्हणजे निष्फळ अरण्यरुदनच ठरते. आपआपल्या क्षेत्राबाहेर जर त्यांनी काही विचार केला तर त्यांच्या सहकाऱ्यांकडून त्यांचा अधिक्षेप होतो आणि सरकारमान्य शास्त्रीय संघटनांकडून त्यांना काडीचाही पाठिंबा मिळत नाही. कै. डॉ. सी. व्ही. रामन ह्यांची भारतातील परिस्थितीबद्दल अशीच तक्रार होती.

---

## सिगारेट सोडा आणि दीर्घायुषी व्हा

क्षय आणि छातीचे रोग ह्याविषयक अखिल भारतीय परिषदेने सिगारेट ओढण्यास बंदी घालणारा कायदा करण्याची शिफारस सरकारला केली आहे. फुफ्फुसाचा कॅन्सर, खोकला, हृद्यरोग, हे भारतात वाढत आहेत, हे त्या ठरावाचे कारण आहे. ग्रेट ब्रिटनमधील रॉयल कॉलेज ऑफ फिजिशिअन्सनी प्रसिद्ध केलेल्या आढाव्याप्रमाणे सिगारेटस् नसत्या तर १९६८ मध्ये मृत्यू पावलेल्या ३५ ते ६४ वर्षे वयाच्या ९९,००० लोकांपैकी ३१,००० लोक आज जिवंत राहिले असते. ३५ वर्षांचा मनुष्य धूम्रपान करीत नसेल, तर तो ४५ वर्षांचा होण्याच्या आत मरण्याची शक्यता ७५ मध्ये १ एवढी असते; धूम्रपानी लोकांत ती शक्यता २२ मध्ये १ एवढी असते. सिगारेटच्या जाहिरातींवर बंदी, सावजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी, डॉक्टर्स व शिक्षक ह्यांना जनतेपुढे आदर्श ठेवण्यासाठी धूम्रपान सोडन देण्याचे आवाहन, इत्यादी सूचना रॉयल कॉलेजने केल्या आहेत.

---

# नांदेडचे भाग्य आणि वैभव, सहकारमहर्षी, विकासमहर्षी

# पद्मश्री श्री. शामरावजी कदम



गेल्या दहा वर्षात नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण विभागाचा विकास करण्याच्या दृष्टीने जे झपाट्याने कार्य झाले याचे बरेच श्रेय उदयोन्मुख नेतृत्वात प्रकर्षाने अग्रेसर ठरलेल्या श्री. शामराव कदम यांच्या कर्तबगार व कुशल नेतृत्वाकडे जाते.

श्री. शामराव कदम यांचा जन्म १९२० साली, विजयादशमी दिवशी, नांदेड तालुक्यातील लिंबगाव सारख्या लहान खेड्यात एका मध्यम शेतकऱ्याच्या कुटुंबात झाला. त्यांचे वडील गावचे पोलीस पाटील असल्यामुळे त्यांच्या स्वभावातला करारीपणा, सचोटी, निःस्पृहता व धडाडी या गुणांचा वारसा त्यांना मिळाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण लिंबगाव येथे झाले. नोकरीऐवजी स्वतंत्र वृत्तीने एखादा व्यवसाय करावा आणि मानाने जगावे असा दृष्टिकोन पुढे ठेवून श्री. शामराव कदम यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत त्या वेळची हैद्राबाद शासनाची वकिली परीक्षा उत्तीर्ण केली.

आपला व्यवसाय करत असताना मागासलेल्या मराठवाड्याचा विकास करण्याच्या दृष्टीने त्यांच्या मनाने उठाव घेतला. त्यांचे मन वकिलीच्या पेशात रमेना. त्यांच्या कर्तृत्वाला हे क्षेत्र थिटे पडले. वकिलीच्या कामासाठी त्यांच्याकडे येणाऱ्या शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्याकडे त्यांनी लक्ष घालण्यास सुरुवात केली. पुढे पुढे त्यांच्या घरी अशिलाऐवजी शेतकऱ्यांचीच गर्दी होऊ लागली. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडविण्याच्या दृष्टीने कार्य करत असतानाच ते नकळत राजकारणात ओढले गेले.

राजकारणापेक्षा ग्रामीण विकासाकडे त्यांनी आपले लक्ष केन्द्रित केले. पिढ्यानुपिढ्या चालत आलेली शेतकऱ्यांची दैन्यावस्था, चक्रवाढ व्याजाचे पाश, शेतीच्या जुन्या पद्धती, समाजाला बुजणारा शेतकरी वर्ग कसा संपन्न होईल, याच प्रश्नाने त्यांना बेचैन केले. शेतीचे उत्पादन वाढविल्याशिवाय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. तथापि शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी भांडवल म्हणजे पैसा पाहिजे याची त्यांना तीव्रतेने जाणीव झाली. नुसते शेतीचे उत्पादन वाढवा म्हणून कोरडा उपदेश करण्यापेक्षा त्यांना शेतीसाठी भांडवल मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे जरुरीचे आहे हे त्यांनी ठरविले. यासाठी पंचवार्षिक योजनेखाली ग्रामीण विकासाच्या ज्या ज्या योजना होत्या त्यांची त्यांनी तपशीलवार माहिती घेतली. त्या योजनांचा गोरगरिबांस फायदा करून देण्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना तगाईचे फार्म भरुन देण्यापासून तो ती त्यांच्या पदरात पडेपर्यंत स्वतः प्रयत्न केले.

त्यांची सुरुवातीलाच जिल्हा विकास मंडळावर उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांच्या आवडीचे क्षेत्र त्यांना मिळाले तसा त्यांनी विकासाच्या विविध योजना पद्धतशीर राबविण्याच्या दृष्टीने अभ्यास केला. कुठलीही योजना पुढे आली की तिचा सर्व दृष्टींनी अभ्यास करावयाचा आणि मग सुज्ञ शेतकऱ्यांचा अनुभव व तज्ज्ञ अधिकाऱ्यांचे ज्ञान यांची सांगड बरोबर जमत असेल तरच ती योजना हाती घ्यावयाची ! एकदा का ती योजना हाती घेतली की मग तिला पूर्णत्व प्राप्त करून द्यावयाचे हेच तर त्यांचे वैशिष्ट्य ! त्यांनी घेतलेले निर्णय अंतिम साफल्याच्या दृष्टीने तंतोतंत खरे ठरले, आणि यामुळेच कठोर वृत्तीचे निर्भीड शामराव कदम ग्रामीण भागात कमालीचे लोकप्रिय होत गेले. गेल्या दहा वर्षात नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण विकासाची झालेली स्फूर्तिदायक प्रगती पाहून महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी त्यांना "विकासमहर्षी" असे संबोधून त्यांचा उचित असा गौरव केला.

सहकाराच्या गुरुकिल्लीने ग्रामीण विकासाचे मंदिर बहुजनांसाठी खुले करून देता येईल असा त्यांचा दृढविश्वास झाला. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावी सहकारी संस्था स्थापन करून या संस्थेच्या द्वारे शेतकऱ्यांस नवीन पद्धतीची औजारे, खते, बी-बियाणे व आवश्यक ते आर्थिक साहाय्य करण्याची शिस्तबद्ध योजना त्यांनी विकास मंडळापुढे मांडली. सहकारी चळवळीच्या कार्याला चालना मिळाली आणि याच वेळी म्हणजे १ सप्टेंबर १९५८ रोजी त्यांची नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाली.

श्री. शामराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वैभवशाली प्रगती केली. याची साक्ष म्हणजे नांदेड शहरात स्टेशन रोडवर उभी असलेली बँकेची भव्य वास्तू. या बँकेच्या ३२ शाखा या जिल्ह्यात कार्यान्वित झाल्या असून या बँकेतर्फे जिल्ह्यातील ९३४ शेतकी सोसायट्या, ८ खरेदी-विक्री संघ, २ तेलगिरण्या, २ जिनिंग आणि प्रेसिंग संस्था, १४ विणकर संघ आणि ४०

औद्योगिक संस्था, ८८ घरबांधणी संस्था व इतर संस्थांनाही कर्जपुरवठा केला जातो. दहा वर्षांपूर्वी म्हणजे १९५७ साली या जिल्ह्यात एकूण ६१३ सहकारी संस्था व फक्त ३०,९३३ सभासदांची संख्या होती. आज या जिल्ह्यात १,९५२ सहकारी संस्था कार्यान्वित झाल्या असून सभासदांची संख्या १,४३,९१४ झाली आहे. सहकारी चळवळीच्या संख्यात्मक वाढीपेक्षा त्यांच्या गुणात्मक वाढीकडेही त्यांनी विशेष लक्ष पुरविले. यासाठी त्यांनी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या. तालुका पातळीवर सुपरवायझिंग युनियन स्थापन करून या संस्थांना योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला. १९६० साली जिल्हा खरेदी-विक्री संघाची स्थापना करण्यात आली. या संघाच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड झाली. या संघाच्या तालुका पातळीवरील आठ शाखांतर्फे शेतकऱ्यांना बी–बियाणे, खते, नवी अवजारे, रोग-प्रतिबंधक औषधे पुरविण्यात येत असून शेतकऱ्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू असल्यामुळे हा जिल्हा खरेदी–विक्री संघ महाराष्ट्रात नावारूपास आला आहे.

सहकारी चळवळीचे क्षेत्र हे शेतीमालाच्या उत्पादनापुरतेच मर्यादित न ठेवता त्या मालावर प्रक्रिया करून शेतकऱ्यांच्या श्रमाचा मोबदला त्यांच्या पदरात टाकण्याच्या दृष्टीने श्री. कदम यांनी निश्चय केला. कापसाचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेड जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर सूतगिरणी असावी अशी कल्पना महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री नामदार श्री. शंकरराव चव्हाण यांनी बोलून दाखविताच या कल्पनेलाच प्रेरणा मानून श्री. कदम यांनी जागेची पाहणी सुरू केली. नांदेड शहराजवळ गोदावरी नदीच्या काठी वाजेगावनजीक जागा निश्चित केल्यावर कमिशन आणणे, परवाना काढणे, शेअरभांडवल गोळा करणे आदी महत्त्वाची कामे श्री. कदम यांनी स्वतः लक्ष घालून केली आहेत. या सहकारी सूतगिरणीचे ते चेअरमन आहेत.

मराठवाडा सहकारी सूतगिरणीचा प्रकल्प १ कोटी, १० लाखांचा असून या गिरणीसाठी घेतलेली मशिनरी अद्ययावत पद्धतीची आहे. पद्मश्री ही पदवी मिळाल्या दिवशीच या गिरणीत सूत काढण्यास प्रारंभ झाला हा एक अपूर्व योगायोग म्हणावयाचा ! नांदेड येथे विणकरांची संख्या फार मोठी आहे. या गिरणीमुळे विणकरांची सुताची गरज भागेल तसेच या गिरणीचे मालक जे शेतीउत्पादक आहेत त्यांना आपल्या मालाच्या भावाची खात्री वाटून तो त्यांच्या पदरात पडेल. यामुळे विणकरांना व उत्पादकांना याचा फार मोठा लाभ होईल.

कृषि-औद्योगिक अर्थव्यवस्थेद्वारे ग्रामीण विभागातील आर्थिक उत्पादनाचे उत्तम उदाहरण म्हणजे कलंबर या गावी सुरू होत असलेला सहकारी साखरकारखाना ! कलंबरचा साखरकारखाना म्हणजे श्री. कदम यांच्या सहकारी क्षेत्रातील असामान्य कर्तृत्वाचा सुंदर आविष्कारच मानला पाहिजे. हा कारखाना साकार करण्यासाठी श्री. कदम यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. प्रतिकूल परिस्थितीत उघड्या माळरानावर भगीरथ प्रयत्नाने त्यांनी सहकाराचे जलसिंचन केले. कर्तव्यकठोर कर्मयोगाने हे स्वप्न हळुवार हाताने जपले. यामुळे कलंबरचा माळ आता बहरून निघाला आहे. या सहकारी साखरकारखान्याचे ते चेअरमन आहेत. हा प्रकल्प दोन कोटी, पंचवीस लाखांचा आहे. कारखाना सुरू झाला की रोज १,२५० टन साखरेचे उत्पादन होईल.

कलंबरपासून १० मैलांच्या परिसरात ८९ गावे असून १५ मैलांच्या परिसरात १४९ गावे येतात. या सर्व गावांचे भाग्य कलंबर साखरकारखान्यामुळे उजळून निघत आहे. लवकरच या साखरकारखान्याचे गोड ध्येय साखरउत्पादनाच्या द्वारे साध्य होईल.

याशिवाय सहकारी औद्योगिक आणि विकास संस्था या योजनेखाली मुदखेड येथे छत्रीचा कारखाना सुरू झाला असून अर्धापूर या गावी ह्यूम पाईपचा कारखाना व नायगाव येथे कातडी कमाविण्याचा कारखाना काढण्याची पूर्वतयारी चालू आहे.

श्री. कदम यांची अलौकिक कर्तृत्वशक्ती पाहून त्यांच्याकडे सहकारी क्षेत्रातील अनेक पदे चालत आली. औरंगाबाद येथील शहाजीनगर हाऊसिंग सोसायटीचे ते अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्य सहकारी साखरकारखाना संघ व अनेक विविध सहकारी संस्थेचे ते पदाधिकारी आहेत. सहकारी क्षेत्रातील विविध संस्थांचा कोट्यवधी रुपयांचा कारभार ते आजही चोखपणे पाहात आहेत. वाजेगाव येथील सूतगिरणीच्या भूमिपूजनप्रसंगी भारताचे सध्याचे गृहमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांनी श्री. शामराव कदम यांचे सहकारी क्षेत्रातील हे अलौकिक कार्य पाहून त्यांना ‘ सहकारमहर्षी ’ असे संबोधून त्यांचा गौरव केला.

हे सर्व पाहिले की, श्री. शामराव कदम या व्यक्तीचे अस्तित्व आता सहकारी संस्था या रूपानेच दिसत असून त्यांचे वैयक्तिक जीवन हे आता सार्वजनिकच झाले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

नांदेड जिल्ह्याच्या कुठल्याही योजनेत ते नाहीत असे नाही. अशा प्रकारे नांदेड बरोबरच पर्यायाने मराठवाड्याच्या अविकसित भागाच्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास करण्याच्या दृष्टीने त्यांचे साधे पण कर्तबगार नेतृत्व अविरत परिश्रम घेत आहे. जनतेला विश्वासात घेऊन आणि सहकारी चळवळीवर नितांत नि अढळ श्रद्धा ठेवून श्री. शामराव कदम यांनी सहकारी क्षेत्रात निष्ठेने कार्य केले. त्यांच्या या कार्यातून सहकाराच्या मूलभूत अशा सुप्त शक्तीचा सुंदर आविष्कार दिसून आला. ते अखिल भारतीय पातळीवरील कसोटीस उतरले. गेल्या प्रजासत्ताक दिनी भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांना ‘ पद्मश्री ’ ही पदवी प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

---

## आग्नेय आशियातून अमेरिकन फौजा कमी होण्याचा तेथील देशांवर परिणाम

आग्नेय आशियातून अमेरिकन फौजा हळूहळू काढून घेण्यात येऊ लागल्या आहेत, त्याचा आग्नेय आशियातील बिगर-कम्युनिस्ट देशांच्या आर्थिक जीवनावर प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे. १९६९ साली आग्नेय आशियात सर्वात जास्त म्हणजे ५,९०,८०० अमेरिकन सैनिक होते, त्यांपैकी ५,४३,४०० दक्षिण व्हिएटनामध्ये होते. ह्या सैन्यावर आणि युद्धावर होणाऱ्या खर्चामुळे कितीतरी स्थानिक लोकांना दुर्मिळ डॉलर मिळत गेले. व्हिएटनाममधील सैनिकांची संख्या आता ३,३९,२०० वर उतरली आहे. तेथील खर्चही निम्म्यावर आला आहे. थायलंड, दक्षिण कोरिया आणि फिलिपाइन्स येथील सैनिक आणि खर्च दोन्हींत घट झाली आहे. अमेरिकन सैनिकांचे प्रयाण ह्या सर्व देशांना चांगलेच जाणवणार आहे.

दक्षिण व्हिएटनामची आर्थिक सुस्थिती युद्ध चालण्यावरच सर्वस्वी अवलंबून आहे. कोट्यवधी अमेरिकन डॉलर तेथे खर्च होत, ते खेचून घेण्यासाठी अमेरिकेतून चनीच्या जिनसा आयात करण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यास अमेरिकेने प्रोत्साहन दिले. व्हिएटनामच्या व्यापाऱ्यांनी आयात परवाने मिळवून भरभराट नफे कमावले. हे परवाने देण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांनी भरपूर लाच खाल्ली. सरकारच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग आयातीवरील जकात हाच आहे.

थायलँडने गेल्या पाच वर्षात सुमारे ५०० कोटी रुपये युद्ध-परिस्थितीमुळे कमाविले आणि १,००,००० लोकांना अमेरिकन तळाभोवती नोकऱ्या मिळाल्या. ४८,००० अमेरिकन सनिकांपकी एक तृतीयांश सनिक थायलँड सोडून जाणार आहेत. अमरिकेने बांधलेले रस्ते आणि बंदरे ही मात्र थायलडला आयती मिळणार आहेत. युद्धामुळे थाई लोकांच्या नीतिमत्तेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. थायलँडमध्ये रजेचा काळ खर्च करण्यासाठी व्हिएट-नाममधील सैनिक येत, त्यामुळे बँकॉकमधील वेश्यांची संख्या दुप्पट होऊन ती २०,००० वर गेली. त्यांची प्राप्ती थायलँडच्या विकासाला उपयोगी पडत नाही.

फिलिपाईन्स आणि दक्षिण कोरिया ह्या देशांनाही अमेरिकन सैन्याचे स्वगृही जाणे जाणवू लागले आहे. ह्या सर्व देशांची शांतताकालीन पुनर्घटना करण्याच्या कामी जपानी व्यापारी पुढाकार घेऊ लागले आहेत. ह्या पुनर्घटनेसाठी अमेरिकन सरकारची मदत लागेलच. अमेरिकन सैन्य काढून घेतल्यामुळे निर्माण होणारी पोकळी अखेर त्या त्या देशानेच भरून काढावयाची आहे.

---

## रोगापेक्षा त्यावरील उपायच घातक

असाध्य रोगाने पछाडलेला एखादा रोगी कंटाळतो आणि जादूटोण्यापासून ते भयंकर डागण्यापर्यंत अघोरी उपाय करून घेण्यासही तयार होतो. पण ही गोष्ट झाली मागासलेल्या लोकांची अगर देशांची. शास्त्रीय ज्ञानात अग्रेसर असलेले देशही एखाद्या विकट समस्येवर भलताच उपाय योजण्याची चूक करताना दिसतात, तेव्हा आश्चर्यच वाटल्याशिवाय राहात नाही. समुद्राचे पाणी बोटीतील घाण तेलामुळे दूषित झाले असल्याची जाणीव सर्व दर्यावर्दी देशांना झाली आहे. काही महिन्यापूर्वी इंग्लंडच्या किनाऱ्यानजीक एक तेलवाहू बोट फुटून तेल समुद्रावर पसरले त्या निमित्ताने दूषित पाण्याची समस्या विशेष जोराने पुढे आली इतकेच. समुद्र व किनारा ह्यावर तेलाचा भला थोरला तवंग पसरल्यामुळे जलांतर्गत प्राणी-जीवनाला मोठा धोका उत्पन्न झाला. कोट्यावधी मासे व पक्षी मृत्युमुखी पडले. पाण्यावर पसरलेल्या ह्या तेलाचा निचरा कसा करावा ह्याविषयी लंडनमध्ये अलीकडे एक परिसंवाद भरविण्यात आला होता. त्यात काही शास्त्रज्ञांनी तवंग नाहीसा करण्यासाठी काही रासायनिक द्रव्यांची शिफारस केली. त्याप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्यावर असे आढळून आले की ही नवी द्रव्ये जलचर जीवनास तेलापेक्षाही अधिक घातक आहेत. फ्रेंच शास्त्रज्ञांनी एक नवीन प्रकारचा पंप शोधन काढला होता. त्याचा उपयोग करून पाण्यावर पसरलेले तेल वेगळे काढता येत होते. खरोखर हा उपाय अधिक स्वस्त, कार्यक्षम आणि मोठ्या प्रमाणावर वापरता येण्यासारखा होता असे म्हणतात. पण कोणत्याही कारणाने असो, ह्या उपायाची उपेक्षा झाली.

---

## वार्धक्य साठीनंतर सुरू होते

रशिआतील जॉर्जिआ राज्यातील काही डॉक्टरांनी वार्धक्याचा खास अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की मानवी शरीरात वार्धक्याच्या प्रक्रिया सुरू होण्याचा आरंभकाल ६० ते ६५ वर्षापासूनचा आहे. त्यानंतरच्या दोन-तीन वर्षात ह्या प्रक्रियेची बाह्य लक्षणे उमटू लागतात आणि त्यांचा प्रसारही होऊ लागतो. मग शरीराला प्राप्त होणारी स्थिती वयाच्या ७० ते ८० पर्यंत फारशी बदलत नाही. वार्धक्याला प्रारंभ झाला म्हणजे प्रथम पेशींची संख्या थोडीशी रोडावते. ही कमतरता मोठ्या आकाराच्या पेशींनी भरून काढण्यात येऊ लागते आणि त्याच बरोबर शरीरांतर्गत चयापचयाची क्रियाही अधिक तीव्रतेने होऊ लागते. हृदयाला मोठी वजने उचलण्याची शक्ती रहात नाही आणि पित्ताशयाची ग्रंथिनांवर संस्कार करण्याची कुवतही उताराला लागते.

---

## अमेरिकन पुढाऱ्यांवर युद्धगुन्हेगारीचा आरोप

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस इंग्लंड-अमेरिका-रशिया ह्या राष्ट्रगटाने जर्मनीच्या युद्धकालीन पुढाऱ्यांवर खटले भरून त्यांच्यापैकी अनेकांना युद्धगुन्हेगार म्हणून शिक्षा दिल्या. हे खटले न्युरेमबर्ग खटले ह्या नावाने प्रसिद्ध आहेत. खटल्यात अमेरिकेच्या बाजूने काम करणारे सरकारी वकील जनरल टेलर ह्यांनी अलीकडे 'न्युरेमबर्ग व व्हिएटनाम' ह्या शीर्षकाचे एक पुस्तक लिहिले आहे. पुस्तकात त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की जपानच्या युद्धकालीन पुढाऱ्यांना युद्धगुन्हेगार ठरविताना जो युक्तिवाद करण्यात आला तो प्रमाण मानला तर व्हिएटनाम युद्धातील अमेरिकन सेनापती जन. वेस्टमोरलँडच काय पण व्हिएटनाममधील युद्धाचे अनेक पुरस्कर्ते पुढारी युद्धगुन्हेगार ठरण्याची बरीच शक्यता आहे.

---

## गोव्यात जुगारीचा अधिकृत अड्डा

गोवा सरकारने जुगाराची सोय असलेले एक अधिकृत होटेल काढण्याची परवानगी भारत सरकारकडे मागितली होती. असे होटल गोव्यात काढले तर परदेशी प्रवासी तेथे अधिक मोठ्या संख्येने येऊ लागतील असा गोव्याच्या सरकारचा अंदाज आहे. होटेल चालविणे तेथील कायद्याच्या चौकटींत बसत असेल तर ते काढण्यास हरकत घेण्याचे कारण नाही असे भारत सरकारने कळविले आहे. अशाच प्रकारची होटेल्स काढण्याची कल्पना केरळ व म्हैसूर सरकारनेही सुचविली होती. परंतु तिचा फारसा पाठपुरावा करण्यात आला नाही. हिंदुस्थानात अशा प्रकारचे द्यूत-भवन अजून कोठेही उभारलेले नाही. नेपाळमधील खाटमांडू येथे मात्र असे एक द्यूतभवन आहे. द्यूतक्रिडा चालविणारे जगातील सर्वांत मोठे भवन मेक्सिकोत आहे.

---

## एअर इंडिआ कॉर्पोरेशनचा नफा घटला

आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक करणाऱ्या एअर इंडिआ कॉर्पोरेशनच्या १९६९-७० च्या व्यवहारात नफ्यात घट झाल्याचे ताज्या अहवालावरून दिसून येते. नफ्यात घट होण्यास ब्रिटनने परदेशांतून कायमच्या येणाऱ्या नागरिकांवर बंधन घालण्याचे एक कारण आहे. ह्या निर्बंधामुळे ब्रिटनला जाणाऱ्या लोकांच्या संख्येत बरीच घट झाली आहे. अहवालाच्या साली कॉर्पोरेशनचा कर आणि व्याजापायी द्याव्या लागणाऱ्या रकमांपूर्वीचा नफा म्हणून ३·०६ कोटी रुपये दाखविण्यात आले आहेत. मागील सालचा हाच आकडा ४·८० कोटी रुपये आहे. म्हणजे नफ्यात १७·५ टक्के घट झाली आहे. कॉर्पोरेशनच्या बोर्डाने साधारण भागभांडवलावर ६ टक्के नफा देण्याची शिफारस केली आहे. नफा वाटण्यासाठी कॉर्पोरेशनला ८०·४५ लाख रुपयांची तरतूद करावी लागेल.

---

## टँकची वाहतुक सहन करणारा पॉलिस्टरचा पूल—

अमेरिकेच्या लष्करासाठी एका प. जर्मन फर्मने पॉलिस्टरचा पूल बनविला आहे. पोर्टेबल कॉम्प्रेसरच्या साहाय्याने तो जाग्यावर फुगवून तयार करता येतो. त्यावरून टँक जाऊ शकते. ह्या पुलावर काही ठिकाणी शेल्सचा मारा झाला, तरी पूल काम देत राहील. पुलाची लांबी १८ मीटर आणि वजन २·२ टन आहे.

**संगीतकारांची मक्तेदारी—** गेल्या वर्षी पडद्यावर आलेल्या एकूण ८६ चित्रपटांपैकी २१ चित्रपटांचे संगीत-नियोजन एकट्या लक्ष्मीकांत-प्यारेलालनी केले, १२ चित्रपटांचे संगीत-नियोजन कल्याणजी-आनंदजीनी केले, १० चित्रपटांचे संगीत-नियोजन शंकर-जयकिशननी केले. म्हणजे, ८६ चित्रपटांपैकी ४३ चित्रपट ह्या तिघांत विभागले गेले. एस. डी. बर्मनच्या वाट्याला चारच चित्रपट आले. नौशाद, सी. रामचंद्र यांना प्रत्येकी एक चित्रपट मिळाला. मदन मोहन, ओ. पी. नय्यर, वसंत देसाई, ह्यांच्या वाट्याला एकही चित्रपट आला नाही. 'रसरंग' ने ही आकडेवारी दिली आहे.

**चित्रपट-निर्मितीचा उच्चांक—** १९७० मध्ये भारतात एकूण ३९५ चित्रपटांची निर्मिती झाली. १९६९ मध्ये ३८३ चित्रपटांची निर्मिती झाली होती. चित्रपट-निर्मितीत मद्रास (२४१ चित्रपट) अग्रेसर असून मुंबई (११७ चित्रपट) दुसऱ्या अनुक्रमाची आहे. कलकत्यात ३७ चित्रपट तयार झाले. दोन चित्रपटांनी सुवर्णमहोत्सव, दहांनी रौप्यमहोत्सव साजरे केले; कित्येक चित्रपट १०० दिवस चालले. एकूण ३९५ चित्रपटापैकी ९६ चित्रपट रंगीत होते.

**सुकार्नोच्या विधवेचा विवाह—** इंडोनेशियाचे दिवंगत प्रेसिडेंट सुकार्नो ह्यांची ३७ वर्षे वयाची विधवा ॲमेलिआ (एकेकाळची फिलिपिनो चित्रपट तारका) हिने भूतपूर्व अमेरिकेचे प्रेसिडेंट आयसेनहोअरच्या खासगी वैमानिकाशी विवाह केला आहे. वधूचा हा चौथा पण वराचा दुसराच विवाह आहे. त्याच्या चार अपत्यांपैकी दोन मुली विवाहास उपस्थित होत्या. कन्यादान वधूच्या २० वर्षाच्या मुलाने केले.

**राष्ट्रगीत ५७ सेकंद वाजणारच—** सिनेमागृहांतून चित्रपट संपल्यावर राष्ट्रगीत लावले जाते. त्यापूर्वीच कित्येक प्रेक्षक निघून जातात. राष्ट्रगीतास ५७ सेकंद लागतात. त्याऐवजी ते १८ ते २० सेकंदांचे करावे, अशी सिनेमावाल्यांची मागणी होती. सरकारने ती फेटाळून लावली आहे.

**स्त्रियांसाठी बँकिंगचे वर्ग—** स्त्रियांना खातेदारांच्या दृष्टिकोनातून बँकिंगची प्राथमिक माहिती व्हावी ह्यासाठी मुंबई येथील बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ बरोडा स्टाफ ट्रेनिंग कॉलेज प्रत्येकी पाच दिवसांचे मोफत वर्ग चालविते. १६ वा वर्ग ८ फेब्रुवारी रोजी सुरू होईल.

**विजेच्या पंख्यांच्या निर्गतीत घट—** १९६८-६९ मध्ये भारताने १,८४,००० विजेचे पंखे निर्गत केले होते. १९६९-७० मध्ये १,६२,००० पंख्यांची निर्गत झाली. त्यामुळे परदेशी चलनाची कमाई १० लक्ष रु. नी कमी झाली.

| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूर ध्व नी | मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३<br>कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)<br>उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६ |
|---|---|---|

## दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक



## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेंक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.


प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक






किर्लोस्कर®

डीज़ल एंजिन
की प्रसिद्धि के कारण
▪ गुणवत्ता ▪ टिकाऊपन
▪ विश्वसनीयता तथा
▪ किसानों की समृद्धि

उत्कृष्ट डीज़ल एंजिन के निर्माता
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड, पूना-३ (भारत)

" ® Registered User-Kirloskar Oil Engines Ltd., Poona-3"

छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा




सुमारे ३०० हून अधिक रस्ता-वाहतूक व्यावसायिकांना बँकेचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.

सुमारे एका कोटीच्या घरात!

तुमच्याही छोट्या-मोठ्या धाडसात तुम्हाला महाराष्ट्र बँकेचे आर्थिक साहाय्य खचितच मिळू शकते.

तपशीलासाठी आजच चौकशी करा.

बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

6987



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)